राजपत्रित वर्ग १ व वर्ग २ च्या अधि-
का-यांना अत्युत्कृष्ट कामाबद्दल आगाऊ
वेतनवाढी मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक:-आवेवा-१०८९/४४/प्र.क्र. १३/आठ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :- २ जून, १९९०.

पहा:- १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-१०७७/सीएन १२७-७९/आठ, दिनांक ४ डिसेंबर, १९७९.

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-१०८५/१६१४/प्र.क्र. २५७/आठ, दिनांक ८ एप्रिल, १९८६.

३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-१०८६/प्र.क्र. १४१/आठ, दिनांक १४ ऑक्टोबर, १९८८.

## शासन निर्णय

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०७७/सीएन-१२७/७९/आठ, दिनांक ४ डिसेंबर, १९७९ मधील पारि. २[५] अनुसार रु. १५००/- या उच्चतम टप्पा पर्यन्तच्या वेतनश्रेणीत वेतन घेणारे वर्ग-१ चे अधिकारी अत्युत्कृष्ट कामाबद्दल आगाऊ वेतनवाढी मिळण्यास पात्र ठरविण्यात आले होते. दिनांक १ जानेवारी, १९८६ पासून शासकीय कर्मचारी/अधिकारी यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आल्या आहेत. असुधारित रु. १०००-१५०० या वेतनश्रेणीला तद्नुरूप रु. ३०००-४५०० अशी सुधारित वेतनश्रेणी असल्याने आता रु. ४५००/- या उच्चतम टप्प्यापर्यन्तच्या वेतनश्रेणीत वेतन घेणारे सर्व अधिकारी आगाऊ वेतनवाढी मिळण्यास पात्र ठरतील. याबाबतची कार्यपध्दती शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही १०८६/प्र.क्र. १४१/आठ, दिनांक १४ ऑक्टोबर, १९८८ मधील परिच्छेद १ व परिच्छेद २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहील.

२. अत्युत्कृष्ट कामाबद्दल मिळणा-या आगाऊ वेतनवाढीचा लाभ उच्चपदस्थ अधिका-यांनाही देण्यात यावा असे आता शासनाने ठरविले असून रु. ५०००/- या उच्चतम टप्प्यापर्यंतच्या वेतनश्रेणीत वेतन घेणारे सर्व वर्ग-१ चे अधिकारी आगाऊ वेतनवाढीस पात्र समजण्यात यावेत व या वेतनवाढी दि. १.१०.८९ पासून मंजूर करण्यात याव्यात असा निर्णय झालेला आहे. या अधिका-यांचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागामधील आस्थापना मंडळ क्र. २ तपासेल व आपल्या शिफारशी मुख्य सचिवांना सादर करेल.

३. सदरचे आदेश अखिल भारतीय सेवेतील अधिका-यांना लागू करता येतील किंवा कसे यावर केंद्र शासनाशी विचारविनिमय करून स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येईल.

४. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक

जिल्हाधिकारी कार्यालय,
8 JUN 1990
जिल्हाधिकारी

कृ. मा. प.

संदर्भ क्रमांक ४७५/८९/सेवा-३ दिनांक १० जानेवारी, ९० अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[भा. म. भणगे]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,